# उपजिल्हाधिकारी (रोहयो),वर्धा यांचे कार्यालय

प्रशासकीय भवन, सिविल लाईन, सेवाग्राम रोड, वर्धा
Email ID:-dycollwardha@mahmgnrega.com Phone No:-०७१५-२२४३२४९

क्र. कक्ष-फ/रोहयो/स.ले.अ./कवि 1050 २०१६-१७
उपजिल्हाधिकारी कार्यालय,वर्धा
दिनांक: 20/09/2016

## निविदा सूचना

महात्मा महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत वर्धा जिल्ह्यातील आठ तालुके व अंतर्गत अंतर्गत ग्रामपंचायत मध्ये पूर्ण झालेल्या १०० कामांची छायाचित्रे काढावयाची आहे. छायाचित्रे काढण्याकरिता खालील अटी व शर्तीवर निविदा मागविण्यात येत आहे. तरी ईच्छूक उमेदवारांनी निविदा बंद लिफाफ्यात दिनांक २८ सेप्टेंबर २०१६ रोजी सांयकाळी ५.३० वाजेपर्यत उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, प्रशासकीय भवन सिव्हील लाईन, सेवाग्राम रोड, वर्धा येथे सादर करावे. सर्व अटी व शर्तीचे खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील |
|---|---|
| १ | निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक २८ सेप्टेंबर - २०१६ वेळ सांयकाळी ५.३० वाजेपर्यत राहील. |
| २ | प्राप्त झालेल्या निविदा जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा येथे दिनांक २९ सेप्टेंबर - २०१६ दुपारी ४.०० वाजता वाजता उघडण्यात येतील |

### अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहतील.

१) छायाचित्र काढण्याकरिता DSLR Professional Camera वापरणे बंधनकारक राहील

२) काढण्यात आलेले १०० कामाचे १०० छायाचित्र Soft copy व Hard copy मध्ये देणे बंधनकारक राहील.

३) फोटो चा आकार (SIZE) Post card size मध्ये देणे बंधनकारक राहील.

४) छायाचित्रे काढण्याच्या कार्यारंभ आदेश दिल्यानंतर २० दिवसाच्या आत दिलेल्या यादीतील १०० कामाचे प्रत्येकी एक या प्रमाणे छायाचित्रे काढून सादर करणे बंधनकारक राहील.

५) काम पूर्ण केल्यानंतर केलेल्या कामाचे भुगतान हे ३० दिवसाच्या आत केले जाईल.

६) कामाकरिता कोणत्याही प्रकारची Stationery/Computer/Vehicle इत्यादी बाबी पुरविल्या जाणार नाहीत.

७) कामाकरिता अग्रिम दिल्या जाणार नाही.

८) सदर फोटो हा Latitude and Longitude मध्ये देणे बंधनकारक राहील.

९) अनामत रक्कम म्हणून उपजिल्हाधिकारी (रोहयो) वर्धा यांचे नावाचा रुपये- २०००/- चा धनाकर्ष (Demand Draft) सुरक्षा ठेव म्हणून जमा करणे आवश्यक राहिल तसेच निविदा व उपजिल्हाधिकारी (रोहयो) वर्धा यांचे नावाचा रुपये- २०००/- चा तयार केलेला धनाकर्ष **(Original D.D.)** हा उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, प्रशासकीय भवन सिव्हील लाईन, सेवाग्राम रोड, वर्धा (फोन नं- ०७१५-२४३२४९) येथे दिनांक २८ सेप्टेंबर - २०१६ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत सादर करावा जर धनाकर्ष वरील दिलेल्या दिनांक व वेळेत सादर झाला नाही. तर संबंधितांची निविदा उघडण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. तसेच नियुक्ती आदेश दिल्यास व तो संबंधितांनी नाकारल्यास सदर सुरक्षा ठेव जप्त करण्यात येईल.

१०) निविदा अटी व शर्ती मध्ये फेरबदल करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी वर्धा यांचाकडे राखून ठेवण्यात येत आहे.

११) कोणतीही निविदा मंजूर अथवा नामंजूर करण्याबाबत जिल्हाधिकारी वर्धा यांचा निर्णय अंतिम राहील व तो सर्वावर बंधनकारक राहील.

१२) ज्या कामाचे छायाचित्रे काढावयाचे आहे त्या कामांची यादी उपजिल्हाधिकारी (रोहयो) जिल्हाधिकारी वर्धा या कार्यालयाकडून उपलब्ध करून देण्यात येईल. दिलेल्या यादीनुसार छायाचित्रे काढणे बंधनकारक राहील.

१३) वर्धा जिल्ह्यातील आठ हि तालुक्यामधील ग्रामपंचायत मध्ये पूर्ण झालेल्या कामाचे फोटो काढण्याकरिता स्वः खर्चाने जावे लागेले, याकरिता कुठल्याही प्रकारचे शासकीय वाहन उपलब्ध करून देण्यात येणार नाही.

१४) प्रत्येक फोटो मागे पुरविण्यात आलेल्या यादीनुसार work name/work code/block name/ Grampanchayat name/ इत्यादी लिहिणे बंधनकारक राहील.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक
म.गा.रा.ग्रा.रो.ह.यो.जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा

# निविदा अर्ज

प्रती,
मा. उपजिल्हाधिकारी (रोहयो)
जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा

विषय:- महात्मा महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत वर्धा जिल्ह्यातील आठ तालुके व अंतर्गत ग्रामपंचायत मध्ये पूर्ण झालेल्या १०० कामांची छायाचित्रे काढण्याबाबत.

नाव:-

संपूर्ण पत्ता:-

मोबाईल क्रमांक:-

इ-मेल:-

निविदा रक्कमचा तपशील खालील प्रमाणे

| अ क्र | कामाचा प्रकार | दर रक्कम ( प्रति फोटो) | | एकूण रक्कम | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | | 4 | |
| | | दर अंकात:- | दर अक्षरी:- | रक्कम अंकात:- | रक्कम अक्षरी:- |
| 1 | 100 Post card size photo | | | | |

टीप:- वरील प्रमाणे रकाना 3 मध्ये 1 एक फोटो चा दर अक्षरी व अंकात नमूद करावा तसेच एकूण १०० फोटोची रक्कम रकाना 4 मध्ये अक्षरी व अंकात नमूद करणे आवश्यक आहे.

स्वाक्षरी